आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
३१ मार्च २०२५ -सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून मुंबई दौऱ्यावर, उद्या रिझर्व्ह बँकेच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार

- औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक, त्याचं उदात्तीकरण करू देणार नसल्याचं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण

- राज्यात सर्वत्र रमजान ईद सणाचा उत्साह, विविध ठिकाणी सामूहिक नमाज अदा

**आणि**

- एप्रिल ते जून हा कालावधी यंदा नेहमीपेक्षा जास्त उष्ण राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाकडून व्यक्त

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. राष्ट्रपती आज संध्याकाळी मुंबईत येणार असून उद्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९० व्या वर्धापन दिन सोहळ्याच्या समारोप समारंभाला त्या उपस्थित राहतील.

**<><><><><>**

नागपुरात भारती कृष्ण विद्या विहार इथं वैदिक गणिताचं गुणवत्ता केंद्र उभारलं जावं, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केली आहे. त्यासाठी राज्य शासन संपूर्ण सहकार्य देईल, असं आश्वासनही त्यानी दिलं.

**<><><><><>**

औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक आहे, मात्र त्याचं उदात्तीकरण करू दिलं जाणार नाही, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. ते आज नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते.

औरंगजेबाचा मुद्दा नाहक उपस्थित केला जात असल्याचं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते सुरेश उर्फ भैय्याजी जोशी यांनी सांगितलं. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी औरंगजेबाच्या कबरीविषयी केलेल्या टिपणीबद्दल प्रतिक्रिया देताना ते नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. औरंगजेब इथंच मरण पावला, त्यामुळे त्याची कबर इथं आहे आणि ती तिथेच राहील, ज्याची श्रद्धा आहे तो कबरीला भेट देईल असं जोशी म्हणाले.

**<><><><><>**

ईद उल फित्र अर्थात रमजान ईद हा सण आज सर्वत्र उत्साहात  साजरा केला जात आहे. पवित्र रमजान महिन्यानंतर येणाऱ्या या सणानिमित्त  आज ठिकठिकाणच्या मशिदी आणि ईदगाहमधे सामूहिक नमाज अदा करण्यात आली. मुस्लीम बांधव एकमेकांना भेटून शुभेच्छा, मिठाई आणि भेटवस्तू  देत ईदचा आनंद साजरा करत आहेत. या विषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

## होल्ड व्हाइस कास्ट

***छत्रपती संभाजीनगर*** *इथं छावणी परिसरातल्या ईदगाह मैदानावर सामुहिक नमाज पठण करण्यात आलं.* ***वाशिम****मधे ईदगाह मैदानावर भाविकांनी नमाज अदा करत जगात शांतता नांदावी, अशी प्रार्थना केली. त्यानंतर गळाभेट घेत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.* ***अकोल्या****मधे हरिहर पेठेतल्या मैदानावर भाविकांनी  नमाज अदा  केली. अरबी भाषेतले खुत्बा पठण सैय्यद फैजानुद्दीन यांनी केलं तर काजीमुद्दीन खातिब यांनी सामूहिक दुवा केली.* ***हिंगोली****तही भाविकांनी ईदची नमाज अदा केली.* ***सोलापूर****मधे ईद उत्साहात साजरी झाली. मुफ्ती सय्यद अमजद यांनी ईदगाह मैदानावर जमलेल्या भाविकांना एकतेचा संदेश दिला.* ***नांदेड****मधे देगलूर नाका इथल्या मैदानावर भाविकांनी नमाज अदा केली.* ***धुळे*** *शहरातही ईदचा उत्साह दिसून आला.* ***कोल्हापुरात*** *मुस्लिम बोर्डिंगच्या मैदानावर नमाज पठण झालं. सर्व धर्मीय नागरिक यात सहभागी झाले होते.* ***सांगली****त जुन्या बुधगाव रस्त्यावरच्या मैदानावर सामुहिक नमाज पठण करण्यात आलं. तर* ***मिरजेत*** *शाही ईदगाह मैदानावर  नमाज अदा करण्यात आली.* ***नाशिक****मधे ईदच्या निमित्तीने वक्फ दुरुस्ती विधेयकाला नागरिकांनी विरोध केला. काळ्या फिती लावून भाविकांनी नमाज पठण केलं.*  ***अहिल्यानगर***

*जिल्ह्यात भाविकांनी ईद उल फित्र उत्साहात साजरी केली. इथल्या कोठला मैदानात सामुहिक नमाज अदा करण्यात आली.*

**<><><><><>**

राज्यात गेल्या पाच वर्षात अर्भक मृत्यु दरात घट होत असल्याचं सार्वजनिक आरोग्य विभागानं म्हटलं आहे. राज्याचा नवजात अर्भक मृत्युदर ११ टक्के असल्याचं केंद्र शासनाच्या संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणातून समोर आलं आहे. राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये नवजात शिशूंसाठी ५५ विशेष काळजी कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. इथे उपचार घेऊन बरे झालेल्यांची संख्या मोठी असल्याचं आरोग्य विभागानं म्हटलंय.

**<><><><><>**

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना उद्यापासून UPS-Unified Pension Scheme अर्थात एकीकृत निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय उपलब्ध होणार आहे. NPS अर्थात राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे सदस्य असलेल्या कर्मचाऱ्यांना ३ महिन्यात NPS किंवा UPS यापैकी एक पर्याय निवडायचा आहे. UPS ची वैशिष्ट्यं The Pension Fund Regulatory and Development Authority नं नुकतीच जारी केली आहेत. १ एप्रिल २००४ नंतर केंद्र सरकारच्या सेवेत रुजू झालेल्या २३ लाख कर्मचाऱ्यांना यासाठी ऑनलाइन नोंदणी करता येईल. यात किमान २५ वर्ष सरकारी सेवा केलेल्यांना शेवटच्या वर्षभराच्या मूळ वेतनाच्या सरासरीच्या किमान ५० टक्के इतके निवृत्ती वेतन मिळेल. सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर कुटुंबाला निवृत्ती वेतनाच्या ६० टक्के इतकी रक्कम मिळेल. किमान १० वर्ष सेवा झालेल्यांना UPS अंतर्गत किमान १० हजार रुपये निवृत्ती वेतनाची हमी देण्यात आली आहे.

राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना सुधारित निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय आजपर्यंत निवडायचा होता. त्यांना आता वर्षभराची मुदतवाढ सरकारनं दिली आहे.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या अर्धमसला इथं धार्मिक स्थळावर स्फोट केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या आरोपींना विशेष न्यायालयानं ३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपींकडे जिलेटिनच्या कांड्या कशा आल्या, यात आणखी कुणी सहभागी आहे का याचा तपास एटीएस करत आहे.

<><><><><>

बीड जिल्हा कारागृहात शनिवारी झालेल्या वादावादीनंतर कारागृह अधीक्षकांनी चौघांना छत्रपती संभाजीनगरातल्या हरसुल कारागृह इथं पाठवलं आहे. यात महादेव गीत्ते, मुकुंद गित्ते, राजेश वाघमोडे, राजाभाऊ नेहरकर या चौघांचा समावेश आहे, अशी माहिती कारागृह अधीक्षक बी.एन. मुलाणी यांनी दिली.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या कान्नापूर या गावात तरुणाची हत्या झाली आहे. ही हत्या पूर्ववैमनस्यातून झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. या प्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात दहा जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

<><><><><>

महायुतीच्या सरकारच्या काळात राज्यातल्या कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे. बीडमध्ये गुंडाराज आले असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहखात्याचा मोह सोडून राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

<><><><><>

'म्हाडा'नं येत्या आर्थिक वर्षात १९ हजार ४९७ सदनिकांचं बांधकाम करण्याचं उद्दीष्ट ठेवलं आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात ९ हजार २०२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सुमारे १५ हजार ९५७ कोटी रुपयांचा हा अर्थसंकल्प मंजूर झाला असून, चालू आर्थिक वर्षाच्या १० हजार ९०१ कोटी रुपयांच्या सुधारित अर्थसंकल्पालाही प्राधिकरणाची मंजुरी मिळाली आहे.

म्हाडाच्या मुंबई मंडळाअंतर्गत येत्या आर्थिक वर्षात ५ हजार १९९ सदनिकांची उभारणी प्रस्तावित आहे. त्यासाठी ५ हजार ७४९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

<><><><>

मुंबई होणाऱ्या वेव्ह परिषदेच्या दरम्यान वेव्हज बाजाराचही आयोजन केलं जाणार आहे. यात चित्रपट, टीव्ही, Animation, VFX, Gaming, and Comics यासारख्या क्षेत्रातले दिग्गज एकत्र येणार आहेत. यात भागिदारी, व्यवसाय विस्तार यासारख्या गोष्टींवर चर्चा होईल. त्यासाठी प्रक्षेपण व्यवस्था, खरेदीदार - विक्रेते यांच्यात बैठकी, आंतर-देशीय भागिदारी वगैरेसाठी व्यवस्था उपलब्ध असेल. www.wavesbazaar.com या वेबसाइटवर याविषयी अधिक माहिती उपलब्ध आहे.

<><><><>

भारतात यंदा एप्रिल ते जून हा कालावधी नेहमीपेक्षा जास्त उष्ण राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. हवामानशास्त्रविभागाचे प्रमुख मृत्युंजय मोहपात्रा यांनी ही माहिती दिली. देशाच्या मध्य, पूर्व आणि वायव्य भागात या काळात सहसा ४ ते ७ उष्णतेच्या लाटा येतात. यंदा त्यांची संख्या दुप्पट होण्याची शक्यता असून केवळ तुरळक ठिकाणचे अपवाद वगळता तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरयाणा, पंजाब, उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओदिशा, छत्तीसगढ, तेलंगण आणि

आंध्रप्रदेश या राज्यांमधे, तसंच कर्नाटक आणि तमिळनाडूच्या उत्तर भागात ही स्थिती राहील. या  काळात वाढलेल्या उष्म्यामुळे विजेची मागणी देखील ९ ते १० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

मुंबई आणि परिसरातल्या विविध भागांमधे या महिन्यात तपमानात १३ अंश सेल्सिअसपर्यंत तफावत दिसून आल्याचं रेस्पायरर लिव्हिंग सायन्सेसनं जारी केलेल्या विश्लेषणात नमूद केलं आहे. १ ते २२ मार्च या कालावधीत वसई पूर्व आणि घाटकोपरमधे सरासरी ३३ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली.

**<><><><><>**

आयपीएलमध्ये आज मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. मुंबईत वानखेडे मैदानावर त्यांचा कोलकाता नाईट रायडर्स विरुद्धचा सामना साडे ७ वाजता सुरू होईल.

**//<><><><><>//**